**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**शुक्रवार, दिनांक ०७ जून २०२४**

**ठळक बातम्या**

- **नरेंद्र मोदी येत्या रविवारी तिसऱ्यांदा घेणार पंतप्रधानपदाची शपथ- आज राष्ट्रीय लोकशाही आघाडीची बैठक दिल्लीत संपन्न.**
- **१८ व्या मुंबई आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचं दिनांक 15 ते 21 जून दरम्यान मुंबईसह ५ महानगरांत आयोजन.**
- **केंद्र आणि राज्य पुरस्कृत आवास योजनांच्या अंमलबजावणीत गोंदिया जिल्हा नागपूर विभागात प्रथम.**
- **नागपूर शहरातील नाग, पिवळी आणि पोहरा या तिन्ही प्रमुख नद्यांची आतापर्यंत एकूण ९० टक्के स्वच्छता.**

*****

एनडीए बैठक

भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते नरेंद्र मोदी येत्या रविवारी दि. ९ जून रोजी तिसऱ्यांदा पंतप्रधानपदाची शपथ घेणार आहेत. राष्ट्रपती भवनात सायंकाळी ६ वाजता शपथविधी सोहळा होणार आहे. भाजप नेते प्रल्हाद जोशी यांनी आज एनडीएच्या संसदीय पक्षाच्या बैठकीत ही माहिती दिली. जुन्या संसदेच्या मध्यवर्ती सभागृहात आज राष्ट्रीय लोकशाही आघाडीची बैठक पार पडली. सर्व नवनिर्वाचित खासदार, राज्यसभा खासदार, एनडीएशासित राज्यांतील मुख्यमंत्री आणि नेत्यांच्या उपस्थितीत नरेंद्र मोदी यांना राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या संसदीय पक्षाचे नेते म्हणून निवडण्यात आलं. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी पंतप्रधानपदासाठी नरेंद्र मोदींच्या नावाचा प्रस्ताव ठेवला. त्याला टीडीपीचे नेते चंद्राबाबू नायडू, बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंसह सर्व घटक पक्षांनी पाठिंबा दिला. बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी या प्रस्तावाला पाठिंबा देत लवकरच सरकार स्थापन करण्याची चर्चा केली. शिवसेनेचे एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीही या प्रस्तावाला मंजुरी दिली. यावेळी सर्व नवनिर्वाचित खासदारांचं नरेंद्र मोदी यांनी अभिनंदन केलं आणि तिसर्यांदा एनडीएवर विश्वास दाखविल्याबद्दल देशवासीयांचे आभार मानले. एनडीए म्हणजे सुशासन आणि गरीब कल्याण हा आमच्या सुशासनाचा केंद्रबिंदू राहिला आहे आणि पुढेही राहील, असं प्रतिपादन मोदी यांनी यावेळी केलं.

## रेपो दर

रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या द्वैमासिक पतधोरण आढावा समितीच्या बैठकीत रेपो दरात कोणताही बदल न करण्याचा निर्णय झाला. त्यामुळे रेपो दर 6.5 टक्क्यांवर कायम राहणार असल्याची माहिती आरबीआयचे गव्हर्नर शक्तिकांत दास यांनी आज दिली. परिणामी, स्थायी ठेव सुविधा दर 6.25 टक्के आणि सीमांत स्थायी सुविधा दर तसंच बँक दर 6.75 टक्के आहे. चालू आर्थिक वर्षातील पतधोरण समितीची ही दुसरी बैठक होती. आरबीआयने रेपो दरात फेब्रुवारी 2023 मध्ये शेवटचा बदल केला होता. म्हणजेच गेल्या 16 महिन्यांपासून रेपो दर स्थिर आहेत. रिझर्व्ह बँकेने आर्थिक वर्ष २०२४-२५ साठी विकास दराचा अंदाज 7 टक्क्यांवरून 7.2 टक्के केला आहे. तसेच चालू आर्थिक वर्षाच्या दुसऱ्या तिमाहीत 7.2 टक्के विकासदराचा अंदाज व्यक्त केला आहे. आधी तो 6.9 टक्के होता. महागाईचा दर आणि विकासदरात समतोल साधला जात असल्याचं दास यांनी पतधोरण जाहीर करताना सांगितलं. रिझर्व्ह बँकेचं पतधोरण महागाई आटोक्यात ठेवणारं आणि महागाईचा दर दीर्घकाळ ४ टक्क्यांवर स्थिर ठेवण्यासाठी वचनबद्ध असल्याचं ते म्हणाले.

## १८ वा मुंबई चित्रपट महोत्सव

१८ वा मुंबई आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव दिनांक 15 ते 21 जून दरम्यान मुंबईत आयोजित करण्यात येत असल्याची माहिती आज माहिती आणि प्रसारण मंत्रालयाचे सचिव संजय जाजू यांनी दिली. हा महोत्सव FD-NFDC संकुलात होणार आहे. सोबतच मुंबई आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवातील चित्रपटांचं प्रदर्शन दिल्लीतील सिरिफोर्ट ऑडिटोरियम, चेन्नई इथं टॅगोर चित्रपट केंद्र, पुणे येथील एनएफएआय ऑडिटोरियम आणि कोलकाता इथं एसआरएफटीआय ऑडिटोरियममध्येही ठेवण्यात येणार आहे, अशी माहिती जाजू यांनी दिली. या वर्षी स्पर्धा विभागात ३८ देशांमधून 65 भाषांमधील तब्बल 1 हजार 18 चित्रपटांची नोंदणी झाली आहे. जागतिक सिनेमा या विभागात ८, आंतरराष्ट्रीय विभागात ६, आशिया विभागात १७ आणि भारतीय विभागात १५ चित्रपट दाखविण्यात येणार आहेत. १८ व्या मुंबई आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाची सुरुवात 'बिली अँड मॉली, ऍन ऑटर लव्ह स्टोरी' या चित्रपटाने होणार आहे. यंदा ७७व्या कॅन चित्रपट महोत्सवात 'ल सिने' पुरस्काराने सन्मानित 'सनफ्लॉवर्स वर द फर्स्ट वन टू नो' हा फिल्म अँड टेलिव्हिजन इन्स्टिट्यूट ऑफ इंडियाच्या विद्यार्थ्यांनी निर्मित लघुपट देखील दाखविला जाणार आहे.

## नीट परीक्षा

नीट परीक्षांचा निकाल ४ जून रोजी प्रसिद्ध झाला. त्यानंतर त्यावर अनेक आक्षेप नोंदविण्यात आले आहेत. त्यासंदर्भात एनटीए अर्थात राष्ट्रीय परीक्षा संस्थेने स्पष्टीकरण प्रसिद्ध केलं आहे. राष्ट्रीय पात्रता परीक्षा अर्थात नीटच्या कट ऑफ गुणांची वाढलेली पातळी ही परीक्षेचा स्पर्धात्मक दर्जा आणि परिक्षार्थींची वाढती तयारी यांचा परिणाम आहे, असं या संस्थेनं सांगितलं आहे. या परीक्षेत सदुसष्ट विद्यार्थ्यांना संपूर्ण गुण मिळाल्याबद्दल निर्माण झालेल्या संभ्रमावर संस्थेने हे स्पष्टीकरण दिलं. त्याचप्रमाणे परीक्षेचा नवीन आणि आधीचा अभ्यासक्रम यातल्या फरकामुळे एकाऐवजी दोन्ही पर्यायांना गुण देण्याचा निर्णय तज्ञांनी घेतल्यामुळेही गुणांमध्ये वाढ झाल्याचं संस्थेनं म्हटलं आहे. या परीक्षेत काही केंद्रांवर गैरव्यवहार झाल्याचा समज निराधार असल्याचा निष्कर्ष संस्थेने त्या केंद्रांवरचे सीसीटीव्ही फूटेज बघून काढला असल्याचंही संस्थेनं स्पष्ट केलं आहे.

## घुसखोरी करण्याचा प्रयत्न

बनावट आधार कार्डाच्या माध्यमातून संसद भवन परिसरात शिरकावाच्या प्रयत्नात असलेल्या तिघांना आज सुरक्षा दलाने अटक केली. हे तिघेही डीव्ही प्रोजेक्ट्स लिमिटेड या कंपनीत मजूर असल्याची माहिती चौकशीत पुढे आली आहे. या तिन्ही आरोपींवर भारतीय दंड संहितेची बनाव आणि फसवणुकीची विविध कलमे लावत गुन्हा दाखल करण्यात आली आहेत. या तिघांनी आधार कार्ड कधी, कुठे आणि कसे बनवले, याचा तपास सुरू आहे. यापूर्वी डिसेंबर 2023 मध्ये संसदेच्या लोकसभा सभागृहात घुसखोरी करण्यात आली होती. त्यावेळेस सभागृहातील बाकांपर्यंत पोहचून गोंधळ घालण्याचा प्रयत्न करण्यात आला होता.

## अमृत महाआवास अभियान 2022-23

अमृत महाआवास अभियान 2022-23 अंतर्गत केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना आणि राज्य पुरस्कृत ग्रामीण आवास योजनांची प्रभावी अंमलबजावणी करणाऱ्या जिल्हयांची निवड आज विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी यांच्या अध्यक्षतेखालील निवड समितीने केली आहे. केंद्र आणि राज्य पुरस्कृत अशा दोन्ही आवास योजनांच्या अंमलबजावणीत सरस कामगिरी करत गोंदिया जिल्हयाने नागपूर विभागात प्रथम क्रमांक पटकाविला आहे. यात भंडारा द्वितीय तर चंद्रपूर जिल्हयाने तृतीय क्रमांक पटकाविला आहे. राज्य पुरस्कृत आवास योजनांच्या अंमलबजावणीतही

गोंदिया जिल्ह्याने प्रथम क्रमांक पटकाविला आहे. चंद्रपूरने द्वितीय तर वर्धा जिल्ह्याने तृतीय क्रमांक पटकाविला आहे. गोंदिया जिल्ह्याने प्रधानमंत्री आवास योजना- ग्रामीण अंतर्गत 2 हजार 450 भूमिहीन लाभार्थ्यांपैकी सर्वच लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करून दिली आहे. तसेच या योजनेंतर्गत मंजूर 95 हजार 291 मंजूर घरकुलांपैकी 92 हजार 972 घरकुलं उभारली असून उर्वरित 6 हजार 168 घरकुलांचे काम प्रगतीपथावर आहे.

नदी सफाई

पावसाळ्यापूर्वी शहरातील नदी आणि नाले सफाईचे काम पूर्ण व्हावे, यादृष्टीने कार्याला मिळालेल्या गतीचे परिणाम दिसू लागले आहेत. नागपूर शहरातील नाग, पिवळी आणि पोहरा या तिनही प्रमुख नद्यांची आतापर्यंत एकूण ९० टक्के स्वच्छता झालेली आहे. १५ जूनपर्यंत नदी स्वच्छतेच्या कामाचे लक्ष्य निर्धारित करण्यात आले असून ते लवकरच पूर्ण होईल, असा विश्वास मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ.अभिजीत चौधरी यांनी व्यक्त केला आहे. फेब्रुवारीपासून सुरू झालेल्या नदी आणि नाले स्वच्छता अभियानामध्ये आतापर्यंत शहरातील तिनही नद्यांच्या सफाई अभियानाने गती पकडली आहे. या सफाई अभियानामध्ये नदीच्या सखोल स्वच्छतेवर भर देऊन जास्तीत जास्त गाळ काढला जात आहे. नाग नदीची १३.१९ किमी, पिवळी नदीची १६.२२ किमी आणि पोहरा नदीची १२.२६ किमी सफाई पूर्ण झालेली आहे. पावसाळ्यामध्ये कोणत्याही प्रकारे नदीच्या प्रवाहाला अडथळा होऊ नये आणि सुरळीतरित्या पाणी वाहून जावे, यादृष्टीने निर्धारित वेळेत काम पूर्ण करण्याचे निर्देश डॉ.चौधरी यांनी दिले आहेत.

पाळीव श्वानांच्या नोंदणी प्रक्रियेला सुरूवात

नागपूर महानगरपालिकेने पाळीव श्वानांच्या नोंदणी प्रक्रियेला सुरुवात केली आहे. मनपा हद्दीतील श्वान पाळण्याकरिता नागपूर महानगरपालिकेत नोंदणी करणे सर्व श्वानमालकांना बंधनकारक करण्यात आले आहे.

दिव्यांगांसाठी कौशल्य व्यवसाय प्रशिक्षण

राष्ट्रीय अपंग कल्याण संस्था (नॉफ), अमरावती द्वारा संचालित महाराष्ट्र शासन मान्यताप्राप्त आणि अनुदानित राष्ट्रीय अपंग कल्याण संस्था कर्मशाळा या कौशल्य व्यावसायिक प्रशिक्षण विद्यालयात १७ ते ४० वयोगटातील अस्थिव्यंग, कर्णबधीर आणि दृष्टिहीन विद्यार्थी-विद्यार्थिनींना त्यांच्या शैक्षणिक पात्रतेनुसार कौशल्य व्यवसाय प्रशिक्षण अभ्यासक्रमास प्रवेश देणे सुरू आहे. यात प्रशिक्षणार्थ्यांना

निःशुल्क प्रशिक्षण, निवास, भोजन तसेच इतर सुविधा देण्यात येतील. वर्ग ७ वी ते १० वी उत्तीर्ण प्रत्येक गरजू दिव्यांग मुला-मुलींना या अभ्यासक्रमांमध्ये शैक्षणिक सत्र २०२४-२५ मधील प्रवेशाकरिता दि.०१ जून ते ३१ जुलै पर्यंत कार्यालयीन वेळेत प्रशिक्षण केंद्र / संस्थेचे कार्यालय, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाजवळ, मार्डी रोड, अमरावती इथं प्रत्यक्ष अथवा दूरध्वनी क्र.8208224487, 9823687022 वर संपर्क साधता येईल.

नैर्ऋत्य मोसमी पाऊस

नैर्ऋत्य मोसमी पावसानं मध्य अरबी समुद्र, कर्नाटक, महाराष्ट्र, तेलंगणा आणि आंध्रप्रदेश किनारपट्टीच्या आणखी काही भागात तसंच बंगालच्या उपसागराच्या बहुतेक सर्व भागात प्रवेश केल्याचं हवामान विभागानं म्हटलं आहे. त्यामुळे पुढल्या २४ तासांत महाराष्ट्रात कोकण तसंच गोवा, गुजरात, आंध्रप्रदेश आणि तेलंगणामध्ये अनेक ठिकाणी सोसाट्याचे वारे आणि मेघगर्जनेसह पावसाची शक्यता असून, हवामान विभागानं या ठिकाणी येलो अलर्ट जारी केला आहे.

हवामान

नागपूरच्या प्रादेशिक हवामान केंद्रानं व्यक्त केलेल्या अंदाजानुसार आगामी काही तासांत विदर्भात बुलढाणा, अकोला, अमरावती, भंडारा, चंद्रपूर जिल्ह्यांत काही ठिकाणी तर वाशीम, यवतमाळ, वर्धा आणि नागपूर जिल्ह्यात सर्वत्र पाऊस पडण्याची शक्यता आहे. विदर्भात आज सर्वाधिक कमाल तापमान गोंदिया इथं ४२ पूर्णांक २ दशांश अंश सेल्सिअस इतकं नोंदवण्यात आलं.

*****